# शिक्षण विभाग (प्राथमिक),जिल्हा परिषद,नागपूर
# अनुसूचित जमाती प्रवर्गातील सरळ सेवेची शिक्षण सेवक संवर्गाची पदभरती प्रक्रियेबाबत.

## जाहीर सुचना

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक - २१/१२/२०१९ अन्वये माननीय सर्वोच्च न्यायालयाचे सिव्हिल अपिल क्रमांक ८९२८/२०१५ व इतर याचिका यामध्ये दिनांक ०६ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या निर्णयाची राज्य अंमलबजावणी करण्याबाबत अनुसुचित जमाती प्रवर्गातील सरळ सेवेची शिक्षण सेवक पदभरती जिल्हा परिषद,नागपूर मध्ये प्राप्त आवेदन पत्रांची छाननी करुन शिक्षण सेवक पदाकरीता उमेदवारांनी आवेदन पत्रासह सादर केलेल्या प्रमाणपत्राचे आधारे निवडीसाठी पात्र व अपात्र उमेदवारांची यादी दिनांक – २३.०१.२०२० रोजी www.nagpur.gov.in व www.nagpurzp.com या संकेतस्थळावर तसेच शिक्षण विभाग(प्राथमिक), जि.प.नागपूर कार्यालयाचे सुचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदर यादीवर उमेदवारांचे आक्षेप दि. २३.०१.२०२० ते दि.- २५.०१.२०२० या कालावधीत (दिनांक २५.०१.२०२० ला सायंकाळी ५.०० वा. पर्यंत) स्विकारले जातील. प्राप्त आक्षेप निकाली काढून निवडीकरीता पात्र उमेदवारांची अंतिम यादी दिनांक - ०३.०२.२०२० रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

उमेदवारांनी आपले आक्षेप लेखी स्वरुपात पूराव्यासह यादीवरील अनु.क्र. तसेच अर्जाचा नोंदणी क्रमांक नमुद करुन विहीत मुदतीत शिक्षण विभाग(प्राथमिक)जि.प. ,नागपूर कार्यालयास सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही.

उमेदवारांनी आवेदन पत्रासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या आधारे सदर यादी तयार करण्यात आली असुन मुळ प्रमाणपत्राची तपासणी करुनच उमेदवारांची निवड करण्यात येईल. कोणतेही आवेदनपत्र पात्र किंवा अपात्र करण्याचा अधिकार जिल्हा निवड समिती यांना राहील. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केल्या जाणार नाही.

स्वा/-
(चिंतामण वंजारी)
सदस्य,
जिल्हा निवड समिती,नागपूर
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद,नागपूर

स्वा/-
(डॉ. कमलकिशोर फुटाणे)
सदस्य/सचिव,
जिल्हा निवड समिती,नागपूर
तथा अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,नागपूर,

स्वा/-
(रविंद्र ठाकरे,भा.प्र.से.)
अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती,नागपूर
तथा जिल्हाधिकारी,
नागपूर

Scanned by CamScanner